2 6 DEC 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्लंबिंग क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी

## किरण जोशी : तंत्रज्ञान अधिविभागात इंडियन प्लंबिंग स्टुडंट चॅप्टरची स्थापना

कोल्हापूर, ता २५ : बांधकाम क्षेत्रातील एकूण १० ते २२ टक्के खर्च फक्त प्लंबिंगसाठी केला जातो. प्लंबिंग क्षेत्रात नवीन संकल्पना स्वयंचलित यंत्रणांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्लंबिंग क्षेत्रात केवळ सिव्हिल इंजिनिअर नव्हे, तर मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स, केमिकल आणि फूड या सर्वच शाखांच्या अभियंत्यांची गरज आहे. सध्या या क्षेत्रात फारच कमी तंत्रज्ञ आहेत. प्लंबिंग क्षेत्रात व्यवसायाच्या व नोकरीच्या अनेक संधी आहेत, असे इंडियन प्लंबिंग असोसिएशनचे अध्यक्ष किरण जोशी यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात इंडियन प्लंबिंग स्टुडंट चॅप्टरची स्थापना केली. यावेळी ते बोलत होते.

क्रीडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर म्हणाले, 'प्लंबिंग हा बांधकाम व्यवसायातील महत्त्वाचा भाग आहे, मात्र यातील समस्या सोडवण्यासाठी संशोधनाची गरज आहे.' इंडियन प्लंबिंग असोसिएशनचे सचिव विजयानंद सोनटक्के म्हणाले, 'चॅप्टरमध्ये इंडियन प्लंबिंग असोसिएशन मार्फत तज्ज्ञ उद्योजकांची व्याख्याने आयोजित केली जातील. बांधकाम क्षेत्रात भेडसावणाऱ्या प्लंबिंगविषयक समस्यांवर विद्यार्थी, प्राध्यापक, व्यावसायिक एकत्र विचार करून नावीन्यपूर्ण संकल्पना संशोधनाद्वारे मात करण्याचा प्रयत्न करतील.' इंडोजर्मन टुल्सचे समन्वयक गोपाळ बेलुरकर यांनी सध्या अभियांत्रिकी आणि प्लंबिंग क्षेत्रात वापरण्यात येणाऱ्या सॉफ्टवेअरविषयी माहिती दिली. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी प्लंबिंग क्षेत्राची व्याप्ती, तेथे गरज असलेल्या ॲटोमॅटिक सेंटरविषयी माहिती दिली. आर्किटेक्ट अँड इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे, इंडियन प्लंबिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष रविकांत साळुंखे, सहसचिव बन्सिलाल शेठ, सदस्य प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. गिरीश कुलकर्णी यांनी करून दिली. आभार प्रा. पि. डी. पाटील यांनी मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात इंडियन प्लंबिंग स्टुडंट चॅप्टरच्या स्थापनेप्रसंगी मान्यवर.**